॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/३०५९ दिनांक :२३/११/२०२४

## अत्यंत महत्वाचे

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालय,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: हिवाळी-२०२४ च्या परीक्षेसाठी दक्षता पथक (Squad) व सहकेंद्र प्रमुख (JCS) पदी नियुक्ती आदेश दिलेल्या प्राध्यापकांना कार्यमुक्त करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा या दिनांक २६/११/२०२४ पासुन विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या परीक्षा केंद्रावर सुरू होणार आहे.

सदर परीक्षा कॉपीमुक्त व सुरळीत चालण्यासाठी विद्यापीठाव्दारे दक्षता पथक (Squad) व सहकेंद्र प्रमुख (JCS) ची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ज्या महाविद्यालयांतील प्राध्यापकांना दक्षता पथक (Squad) व सहकेंद्र प्रमुख (JCS) चे काम करणेसाठी विद्यापीठाव्दारे आदेश दिलेले आहे अशा प्राध्यापकांना परीक्षेच्या कामासाठी प्राधान्य देवून तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

ज्या प्राचार्यांनी विद्यापीठाने आदेशीत केलेल्या प्राध्यापकांना दक्षता पथक (Squad) व सहकेंद्र प्रमुख (JCS) च्या कार्यासाठी आदेश दिलेले आहेत अशा सर्व संबंधीत प्राध्यापकांना कार्यमुक्त करण्यास टाळाटाळ केल्याचे आढळून आल्यास तसेच नियुक्ती आदेश दिलेल्या प्राध्यापकांनी परीक्षेचे काम करण्यामध्ये निष्काळजी अथवा कसुर केल्यास संबंधीतावर विद्यापीठ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

सबब, उपरोक्त बाबीची नोंद घेवून हिवाळी-२०२४ च्या सर्व परीक्षा सुरळीत पार पाडणेसाठी महाविद्यालयाचे मा.प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यापीठास सहकार्य करावे ही विनंती.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ